# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

(स्थानिक गुन्हे शाखा,सातारा)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्रमांक - ०२१६२-२३३९२३ फॅक्स क्रमांक - ०२१६२-२३०२३२
वेबसाईट - www.satarapolice.gov.in मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in

---

प्रेसनोट दिनांक १२ नोव्हेंबर २०२२

( स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई.)

**पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार व इतर दोन इसम यांच्याकडून तीन गावठी पिस्टल, तीन जिवंत राउंड व तीन मोबाईल हॅंडसेट असा एकुण २,०५,६००/- रुपये किंमतीचा माल जप्त .**

---

श्री.समीर शेख, पोलीस अधीक्षक सातारा व श्री.बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी सातारा जिल्हयामध्ये विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची माहिती काढुन त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना श्री.अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने श्री.अरुण देवकर यांनी सपोनि संतोष तासगांवकर यांच्या अधिपत्याखाली बेकायदेशिर शस्त्र बाळगणाऱ्या इसमांच्यावर कारवाई करणेकरीता एक विशेष पथक तयार केलेले आहे.

दिनांक १२ नोव्हेंबर २०२२ रोजी श्री.अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार अमित हणमंत कदम रा.कुंभारवाडा अंतवडी ता.कराड जि.सातारा याच्याजवळ देशी बनावटीचे पिस्टल असून तो अंतवडी फाटा ता.कराड जि.सातारा येथे उभा आहे. अशी बातमी मिळाल्याने त्यांनी सपोनि संतोष तासगांवकर व त्यांच्या पथकास नमुद गुन्हेगारास पकडून कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे कारवाई पथकाने अंतवडी फाटा ता.कराड जि.सातारा येथे जावून कौशल्याने अमित कदम यास पकडून त्याची झडती घेतली असता, त्याच्या कब्जात एक देशी बनावटीचे पिस्टल, तीन जिवंत राउंड व एक मोबाईल हॅन्डसेट असा एकुण ७५,६००/- रुपये किंमतीचा माल मिळुन आला. सदर आरोपी अमित कदम याचेवर यापुर्वीही बेकायदेशिर शस्त्र बाळगल्याचे गुन्हे नोंद असल्याने त्याच्याकडे कारवाई पथकाने सखोल तपास केला असता, त्याने आणखी दोन पिस्टल विक्री करता आणले असल्याचे सांगून ती दोन पिस्टल प्रसाद प्रकाश वाघ रा.विद्यानगर कराड व धीरज उर्फ कान्या बाळासाहेब भोसले रा.मसूर यांच्याकडे आहेत व ते दोघे उंब्रज रोडवरील हॉटेल सिध्दार्थ जवळ उभे आहेत असे सांगितले. मिळालेल्या माहितीप्रमाणे कारवाई पथकाने हॉटेल सिध्दार्थ उंब्रज रोड येथे जावून प्रसाद वाघ व धीरज उर्फ कान्या भोसले यांना ताब्यात घेवून त्याची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यातही प्रत्येकी एक देशी बनावटीचे पिस्टल, व एक मोबाईल असा एकुण १,३०,०००/- रुपये किंमतीचा माल मिळुन आला आहे. सदर बाबत उंब्रज पोलीस ठाण्यास गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालू आहे.

सदर कारवाईमध्ये श्री समीर शेख, पोलीस अधीक्षक सातारा, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांच्या मार्गदर्शनाखाली श्री अरुण देवकर, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा सातारा, सपोनि संतोष तासगांवकर, रमेश गर्जे, पोलीस अंमलदार साबीर मुल्ला, मंगेश महाडीक, मुनीर मुल्ला, अमोल माने, स्वप्नील माने, स्वप्नील दौंड, मयूर देशमुख, मोहसीन मोमीन यांनी सहभाग घेतला असुन कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार यांचे श्री समीर शेख, पोलीस अधीक्षक सातारा, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.

---

(पोलीस अधीक्षक सातारा यांचे मान्यतेने )

प्रति,

सर्व संपादक...

